# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक ३ जुलै, २०२५

## (सकाळी १०.०० ते ११.०० वाजता)

**अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये –**

**(मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक १ व २]**

(१) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"**राज्यातील शाळांमधील पटसंख्या घटली असल्याबाबत**" या विषयावरील **डॉ. प्रज्ञा सातव व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **१५०४** ला दिनांक १३ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"**ग्रामविकास विभागातील कनिष्ठ सहाय्यक या पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचनेच्या अंमलबजावणीबाबत**" या विषयावरील डॉ. परिणय फुके व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **८९८** ला दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(बुधवार, दिनांक २ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ३ व ४ ]**

(३) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात सर्वाधिक प्रदूषणाच्या यादीत गणल्या जाणाऱ्या चंद्रपुर जिल्ह्यात प्रदूषणामुळे मागील सहा महिन्यांमध्ये ५५ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक बाब माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, याच कालावधीत चंद्रपुर जिल्हयात ४ हजार ९९५ रुग्ण आढळून येणे, चंद्रपूर वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात एकूण रुग्णांच्या संख्येपैकी दमा, रेस्पिरेटरी इन्फेक्शन, ब्रॉन्कायटीस, फुफफुस कर्करोग व इतर श्वसनाचे विकार असलेल्या रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात आढळून येत असणे, सन २०२१ ते सन २०२४ या मागील चार वर्षात विविध

अप्रकाशित प्रत

विकारांचे ३३ हजार १९० रुग्ण आढळून आले असून त्यात श्वसनाच्या विकाराचे सर्वाधिक रुग्ण असणे, चंद्रपूर जिल्ह्यात जल,वायू आणि ध्वनीसह विविध प्रकारच्या प्रदूषणामुळे अनेक नागरिकांचा बळी जात असताना पर्यावरण विभागाचे त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे चंद्रपूर जिल्हा प्रदूषण मुक्त करण्यासाठी शासनाने पथदर्शी प्रकल्प (Pilot Project) राबवून त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

(४) **ॲड. अनिल परब, सर्वश्री. सचिन अहिर, सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

" महाराष्ट्राची जीवनदायिनी अशी सार्थ ओळख असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची आर्थिक दुरवस्था झालेली असणे, दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीचे पालन न करता माहे एप्रिल, २०२३ ते माहे जानेवारी, २०२५ अखेरची तुटीची रुपये ९९३ कोटी इतकी रककम शासनाने दिलेली नसणे, महामंडळाच्या उत्पन्नात वाढ नाही त्यामुळे शासनाकडून मिळणा-या सवलत मुल्याच्या रकमेतून केवळ कामगारांना वेतन देण्यात येत असणे, महामंडळाने नुकतीच १४.९५ टक्के भाडेवाढ केल्यामुळे ६३ लाख प्रवासी कमी झाले असणे, कामगारांचे वेतन ७ तारखेपर्यंत देणे बंधनकारक असतांना ते १० तारखेला देण्यात येते, मागील ३ वर्षात महामंडळातील अनेक गैरव्यवहार निदर्शनास येणे, १३१० बसेस व ई-बस खरेदीत झालेला मोठया प्रमाणातील गैरव्यवहार, वाहतूक खात्यातील भ्रष्टाचार, लेखा खात्यातील अनागोंदी कामकाज या सर्व बाबींबाबत विधानपरिषदेत विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधूनही सदर गैरव्यवहारासंदर्भात महामंडळाच्या अधिका-यांकडून विधानमंडळास दिशाभूल करणारी माहिती पुरविली जात असणे, त्यामुळे गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई होत नसणे व गैरव्यवहारात दिवसेंदिवस वाढ होत असणे, तरी महामंडळाच्या या स्थितीला जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई होण्याची आवश्यकता असून त्याकरिता सदर गैरव्यवहाराची चौकशी एसआयटी मार्फत करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीतील अठरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक २ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना)** - [अनुक्रमांक (१)]

(१) **सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप**, विक्रम काळे, सतिश चव्हाण, संजय खोडके, शिवाजीराव गर्जे, प्रसाद लाड, इद्रिस नायकवडी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात एम.डी.ड्रग्ज, ब्राऊन शुगरची तस्करी मोठ्या प्रमाण वाढली असणे, ड्रग्ज तस्करांचे थैमान माजले असून त्यांच्यावर नियंत्रण राहिले नसणे, ठाणे जिल्ह्यात नशेखोरीचा बाजार झाला असणे, माहे मे, २०२५ मध्ये एपीएमसी मार्केट, नवी मुंबई येथे ५० बांगलादेशीय नागरीकांना अंमली पदार्थ विक्री करतांना केलेली अटक, माहे जून, २०२५ मध्ये अंबरनाथ, बदलापूर येथील चहापान टपऱ्यांवर अंमली पदार्थ विक्री होत असल्याबाबत १७ लाख रुपयांचे एम.डी. ड्रग्ज तसेच वसई या ठिकाणाहून एम.डी. ड्रग्जचा साठा व ८ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ साकीनाका पोलिसांनी जप्त केले असणे, ठाणे जिल्ह्यात २ कोटी २१ लाख ८२ हजार रुपयांचे एम.डी.ड्रग्ज पावडर शिळ डायघर पोलीसांनी जप्त केली असणे, शिळ डायघर (जि.ठाणे) पोलीस ठाण्याच्या हद्दीत ड्रग्ज तस्कर मोठ्या प्रमाणावर वास्तव्य करीत असणे, मात्र पुढे कोणतीही कारवाई झाली नसणे, आंतरराष्ट्रीय हायड्रो गांजाचा वापर व तस्करी वाढली असणे, नवी मुंबई येथे कोकेन मोठ्या प्रमाणावर आढळून आले असणे, हायड्रो गांजा हवाई मार्ग थायलंड येथून येत असणे, मुंबई आंतराष्ट्रीय टोळी कार्यरत असणे याला पोलिस खतपाणी घालत असणे, परिणामी नागरिक व मुले

अप्रकाशित प्रत

व्यसनाधिन झाली असणे, नवीन पिढीस धोका निर्माण झाला असणे, दापोली (जि.रत्नगिरी) येथील दापोली-दाभोळ रस्त्यानजीक असलेल्या केळसकर नाका येथे मुस्लिम महिला व तिचे साथीदार दररोज अंमली पदार्थांची विक्री करीत असणे, या महिलेचे स्थानिक पोलीसांशी असलेल्या आर्थिक व्यवहारामुळे स्थानिक पोलिस तात्पुरती कारवाई करीत असणे, कारवाई केल्यानंतरही सदर महिला त्याच ठिकाणी पुन्हा या अंमली पदार्थाची विक्री करीत असणे, कोकणात असंख्य पर्यटक येत असून अशा प्रकारामुळे भविष्यात दापोली अंमली पदार्थ सेंटर होण्याची भीती असणे, या सर्व प्रकरणांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. सत्यजीत तांबे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सुमारे ७ लाख शासकीय तसेच ६ लाख निमशासकीय कर्मचारी कार्यरत असून त्यांच्या वेतनावर दरवर्षी सुमारे ₹१.५९ लाख कोटी तर निवृत्तिवेतनावर ₹५९,८१७ कोटी इतका खर्च होणे, या कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय बिले प्रतिपूर्तीच्या जुन्या पद्धतीने अदा केली जात असल्यामुळे अनेकदा बिले मंजूर होण्यास वर्षानुवर्षे विलंब होणे, विलंबाचा फायदा घेत काही दलाल मंडळी चुकीचे दस्तऐवज तयार करून अवास्तव खर्च मंजूर करून घेत असल्याचे प्रकार समोर येणे, अनेकदा कर्मचाऱ्यांना बिले मंजुरीसाठी दलाल साखळीचा नाइलाजाने वापर करावा लागणे, त्यामुळे भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळणे, सार्वजनिक निधीचा अपव्यय होणे, राज्य शासनाने महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना कॅशलेस पद्धतीने राबवली असून केंद्र सरकारची आयुष्यमान भारत योजना सुद्धा पूर्णपणे कॅशलेस असणे, मात्र इतक्या मोठ्या कर्मचारी वर्गासाठी अजूनही कॅशलेस सुविधा लागू न होणे ही गंभीर बाब असणे, वैद्यकीय सेवेसाठी वारंवार कार्यालयीन फेऱ्या, आर्थिक ताण व उपचारात अडथळा येणे हे शासकीय कर्मचाऱ्यांच्यावर विपरीत परिणाम करणारे असणे, त्यामुळे उपचारानंतर वैद्यकीय बिले प्रतिपूर्तीऐवजी कॅशलेस वैद्यकीय सेवा सुरू करणे, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे व पारदर्शक यंत्रणा उभी करणे आवश्यक असणे, याबाबत वेगवेगळ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

असुधारित प्रत

(३) **श्री.योगेश टिळेकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"पुणे शहराच्या हद्दीलगत असलेल्या ३२ गावांचा पुणे महापालिकेत समावेश झाल्यामुळे पुणे महापालिका प्रशासनावरील ताणही प्रचंड वाढला असणे, पुणे शहराचा चोहोबाजूंनी होत असलेला विस्तार आणि वाढती लोकसंख्या यामुळे शहराचे व्यवस्थापन करणे महापालिकेला अवघड होणे, नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविणे महापालिकेला अशक्य होत असणे, वाढलेली हद्द आणि अपुरी प्रशासकीय व्यवस्था यामुळे महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमधील प्रश्न सुटत नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण असणे, पुणे महापालिकेत पूर्वी असलेल्या भागामध्ये आवश्यक त्या सुविधा पुरविणेच अवघड असताना नवीन समाविष्ट गावातील नागरिकांनाही सोयीसुविधा देण्याची जबाबदारी महापालिकेवर येणे, नवीन गावांमध्ये नियमबाह्य बांधकामे एक ते दीड गुंठ्यामध्ये चार ते पाच मजली उभ्या राहिलेल्या इमारती ही बांधकामे पालिकेत येण्यापूर्वीची असल्याने त्यावर पालिकेला कारवाई करताना अडचण निर्माण होणे, शहराच्या पूर्व भागांत गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात शहरीकरण झाले, इथे राहणाऱ्या नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणे, पुणे महापालिकेचे विभाजन करून नवीन महापालिका केल्यास अनेक समस्या मार्गी लागतील आणि या भागाचा नियोजनबद्ध विकास करता येईल यासाठी पुणे महानगर पालिकेचे विभाजन करून पूर्व पुण्यासाठी नवीन महानगर पालिका निर्माण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सदाशिव खोत, अरुण लाड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोल्हापूर व कर्नाटक सीमालगतच्या अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास बाब प्रस्तावित असणे, या धरणाची उंची वाढविल्यास कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यात प्रचंड पूर परिस्थिती होणार असणे, परिणामी तीनही जिल्ह्यात अतोनात नुकसान होण्याची शक्यता असणे, या धरणाच्या उंची वाढविण्या विरोधात हजारो हरकती सरकारकडे दाखल झाल्या असणे, या धरणाची उंची वाढवण्यास येथील अनेक जमिनी पूरपरिस्थितीने बाधित होणार असणे, त्यामुळे येथील शेतकरी सातत्याने आंदोलन करत आपला विरोध

व्यक्त करीत असणे, याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री अरुण लाड, इद्रिस नायकवडी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिपाई पद कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने याचा तीव्र निषेध करत आंदोलनाचा इशारा दिला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, शिपाई पद कंत्राटी पद्धतीने न भरता वेतनश्रेणीतच भरले पाहिजे असे त्यांची मागणी असणे, राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी संस्था अंशतः पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी आकृतीबंध लागू करण्याबाबतचा शिक्षण विभागाचा निर्णय अन्यायकारक असल्याने या निर्णयाचा संस्था चालक तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी नाराजी व्यक्त करीत असणे, शिपाई पद कंत्राटी करण्याचा निर्णय, ५२ हजार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची घरे उध्वस्त होणार असणे, कंत्राटी पद्धतीने नियुक्ती केलेल्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या देखरेखी खाली मुले सुरक्षित राहतील की नाही याचा देखील शासनाने व सुशिक्षित समाजाने विचार करणे आवश्यक असणे, राज्यभरात बेरोजगारी वाढत असताना अशा प्रकारचा निर्णय घेणे म्हणजे आणखी बेरोजगारी वाढवणारा असणे, यामुळे शिक्षण व्यवस्था कोलमडणार असणे, वेतनेतर अनुदान अपुरे असल्याने त्यामधून शिपाई यांना मानधन देणे संस्थांना शक्य नसणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री. सचिन अहिर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे तांदळा ता.गेवराई जि.बीड येथील शेतकऱ्यांच्या मालकीची ९२ एकर जागेतून अतिक्रमण करुन सरकारने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ काढल्याचे निदर्शनास येणे, खासगी जमीनी असतांनाही सरकारकडून २०१४ मध्ये शेतकऱ्यांना सहायक अभियंता श्रेणी - १, रा. महामार्ग उपविभाग, पाथर्डी यांच्याकडून अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी पाठविण्यात आलेल्या नोटिसा, सरकारने आपल्या प्रत्यक्षात असलेल्या जागेतून महामार्ग न काढता खाजगी जागेत महामार्ग काढून शेतकऱ्यांवर केलेला अन्याय, सरकारच्या नकाशात त्यांच्या मालकीचा रस्ता अद्याप निदर्शनास येत असतांनाही शेतकऱ्यांच्या मालकीच्या जागेतून महामार्ग काढण्यात येणे, २०१६ महसूल आयुक्त यांच्या

अग्रिम प्रत

निदर्शनास सदर बाब आणल्यानंतर जिल्हाधिकारी व केंद्रीय मंत्री यांच्यासमवेत बैठक घेऊनही त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश देणे,परंतु सदर आदेशाची अंमलबजावणी न होणे, तदनंतर २०१९ मध्ये मा.उच्च न्यायालयात, संभाजीनगर येथे दाद मागणे, मा.उच्च न्यायालयाने सर्वेक्षण करुन अहवाल सादर करण्याचे दिलेले आदेश, अद्याप मा.न्यायालयात अहवाल सादर न होणे, सन २०२१ मध्ये पुन्हा न्यायप्रविष्ठ बाब असतांनाही शेतकऱ्यांना नोटिसा पाठविण्यात येणे, मोजणी नकाशामधून सिध्द झालेले असतांनाही दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी नगर कार्यालयाने शेतकऱ्यांना व सरकारला कळविले की आपण खाजगी जागेतून जात आहोत असे सांगूनही सरकारकडून शेतकऱ्यांप्रती कोणतीच ठोस कार्यवाही होत नसल्याने व शेतकऱ्यांनी सर्व स्तरांवरुन दाद मागवूनही कोणतीच ठोस कार्यवाही होत नसल्याने शेतकऱ्यांनी दिनांक १ मे, २०२५ रोजीपासून आत्मदहन करण्याचा इशारा दिल्यानंतर दिनांक २ जून, २०२५ सर्व नाशिक, पाथर्डी, बीड विभागाची बैठक बोलावून चुक कबुल करणे, सन २०१७ रोजी जिल्हाधिकारी, केंद्रीय मंत्री महोदयांनी मोबदला देण्याचे मान्य करुनही अदयाप शेतकऱ्यांना जमीनीचा मोबदला देण्यात आलेला नसणे, शेतकऱ्यांची होत असलेल्या फसवणुकीमुळे त्यांनी पुन्हा आत्मदहनचा दिलेला इशारा, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन तात्काळ करावयाची कार्यवाही. ”

(७) **ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.संदीप जोशी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेतील संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये मागील अनेक वर्षांपासून कोणत्याच सुधारणा करण्यात आल्या नसल्याची बाब निदर्शनास येणे, त्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या उपअभियंता संवर्गातील उमेदवारांवर अन्याय होत असल्याची बाब निदर्शनास येणे, बराच काळ एकाच पदावर कार्यरत असल्याने उपअभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांमध्ये पसरलेली नैराश्याची भावना, सदरहू बाब लक्षात घेता या सेवाप्रवेश नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याची कार्यवाही प्रशासनामार्फत सुरू असणे, त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ९ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्वसमावेशक सेवाप्रवेश नियम तयार करून त्यास सामान्य प्रशासन विभाग, लोकसेवा आयोग व विधी व न्याय विभागाची मान्यता प्राप्त झालेली असतानाही नियमांची अंमलबजावणीसंबंधी होत असलेली दिरंगाई, त्यानुषंगाने दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजी अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या संवर्गाच्या सेवाप्रवेशाबाबतचे सुधारित सेवा प्रवेश नियम दिनांक ३१ मार्च,

अग्रिम प्रत

२०२४ पर्यंत प्रसिध्द करण्याचे आदेश देण्यात येणे, तथापि आजमितीस जवळपास १५ महिन्यांचा कालावधी उलटूनही सुधारित सेवा प्रवेश नियम प्रसिध्द करण्याबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्याची बाब निदर्शनास येणे, या प्रकरणी होत असलेल्या अक्षम्य विलंबामुळे महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेतील संवर्गाच्या पदोन्नतीकरिता पात्र उमेदवारांवर होत असलेल्या अन्यायामुळे त्यांच्यात शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सात : शासकीय विधेयके —**

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** "सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ — महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, जगन्नाथ अभ्यंकर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ — महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५ " विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(२)** "सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ — महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, जगन्नाथ अभ्यंकर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ — महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील

अग्रिम प्रत

प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(२)** "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

आठ : (क) **(मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५ व बुधवार, दिनांक २ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, प्रसाद लाड, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री विक्रम काळे, श्रीकांत भारतीय, कृपाल तुमाने, संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री किशोर दराडे, इद्रिस नायकवडी, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, पंकज भुजबळ, डॉ.परिणय फुके, सर्वश्री हेमंत पाटील, किरण सरनाईक, राजहंस सिंह, रणजितसिंह मोहिते-

पाटील, दादाराव केचे, सदाशिव खोत, संजय केणेकर, अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंत खंडेलवाल, विक्रांत पाटील, संदीप जोशी, योगेश टिळेकर, धर्मगुरु राठोड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरू)**

"राज्यातील मुंबई, एमएमआरडीए, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर इ. महसुली जिल्हे व्यापारदृष्ट्या एकमेकांशी जोडलेले असणे, मुंबई तर देशाची ग्रोथ इंजिन असणे, मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर वाढवण बंदर राज्याला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार असणे, याठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविण्याचे प्रस्तावित असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ प्रस्तावित असणे, वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रीक टन मालाची हाताळणी करणे शक्य असणे, महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर 'गेमचेंजर' ठरणार असणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कामगार तसेच गिरणी कामगार यांच्या घरांचा प्रश्न तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुर्नविकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई उपनगरातील जुन्या व अत्यंत मोडकळीस आलेल्या भाडेकरूंच्या इमारतींना महापालिकेने नोटीस दिल्यानंतर व महापालिकेने किंवा घरमालकाने तोडल्यानंतर १५-१५ वर्षे त्या तशाच अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या मोठया शहरांच्या मेगापॉलीस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ही महानगरे जागतिक पटलावर उच्च दर्जाची व्हावी ही शासनाची महत्वांकाक्षा असणे, मुंबईसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ६४,७८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, "ग्रोथ हब" संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात ७ जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना असणे, "वेव्हज" परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम-मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी हा शासनाचा निर्धार असणे, यामध्ये मेट्रो जाळयाचा विस्तार, रस्ते विकास व वाहतुक सुविधांचा समावेश असणे, मुंबई, पुणे आणि नागपूर मध्ये १४३.५७ कि.मी. चे मेट्रोमार्ग कार्यरत असणे, नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार असणे, पुणे शहरात पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्हयातील हवेली तालुक्याच्या

विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर विचार करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाडयांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतीमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी शहरे विकसित करण्याची व तेथील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, मुंबई, नागपूर व पुणे महानगरातील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकुलीत वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण १४३.५७ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले असणे, ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असणे, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम दृष्टीक्षेपात असणे, नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतराराष्ट्रीय विमानतळाचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले असणे, गडचिरोली हा विकसित जिल्हा बनला असून त्याठिकाणी खनिज संपत्तीचा योग्य वापर करण्यात येऊन 'गडचिरोली स्टील सिटी' हा महत्वाकांक्षी प्रकल्प तेथे साकारण्याचे प्रयोजन असणे जेणेकरुन त्या भागात मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकेल, मुंबई-नागपूर समृध्दी द्रुतगती मार्ग गोंदिया आणि गडचिरोलीला जोडण्याचे प्रस्तावित असणे, नागपूरच्या भोसले राजघराण्यातील राजे रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आपल्या राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला मिळालेले ऐतिहासिक यश, राज्यात एआय पॉलिसी, एआय विद्यापीठ, सायबर सिक्युरिटी इ. धोरणांची अंमलबजावणी करण्यात राज्य अग्रेसर असणे, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला भविष्यातील विकासासाठी जोडण्याचा या शासनाचा प्रयत्न असून सुखी, संपन्न, समृध्द, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख)** **सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजित वंजारी, सचिन अहिर, अशोक उर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

राज्यातील शेतकऱ्यांना सतत नैसर्गिक आपत्ती, बाजारातील अस्थिरता, अपुरा हमीभाव, बोगस बियाणे-खते, अपूर्ण नुकसान भरपाई, अपुरा कर्जपुरवठा आणि कर्जमाफीच्या अंमलबजावणीत होत असलेले दुर्लक्ष यामुळे मोठ्या

अग्रिम प्रत

अडचणींना सामोरे जावे लागणे, कृषी उत्पन्न बाजार समित्यांची संख्या वाढविण्याची गरज असूनही नवीन समित्यांची स्थापना झालेली नसणे, 'AI आधारित कृषी धोरण' आणि 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना केवळ घोषणापुरत्याच राहिल्या असणे, 'शेतकरी ओळख क्रमांक' बंधनकारक करून अनेकांना योजनांपासून दूर ठेवले जात असणे, खते निरिक्षकांच्या अधिकारात ६० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला असल्याने बोगस बियाणे आणि खते यामध्ये मोठ्या प्रमाणावर फसवणूक वाढल्याने सदरहू निर्णय रद्द करण्याची आवश्यकता, आत्महत्याग्रस्त कुटुंबांना वेळेवर मदत मिळत नसणे, कामगार क्षेत्रात श्रम कायद्यांमधील बदल, बोगस लाभार्थी, योजनांमधील अनियमितता आणि गिग व प्लॅटफॉर्म कामगारांसाठी कोणतेही कायदेशीर संरक्षण नसणे, अनेक पारंपरिक आणि असंघटित कामगार विमा, निवृत्ती वेतन व सुरक्षा सुविधा यांपासून वंचित असणे, शालेय शिक्षण विभागात शासकीय शाळांची दुरवस्था, पायाभूत सुविधांचा अभाव, शिक्षक भरतीतील दिरंगाई, अकरावी प्रवेश प्रक्रियेमधील गोंधळ, आणि बोगस शालार्थ आयडी वापरून अपहार होत असणे, मुंबईत धारावी पुर्नविकास प्रकल्पात अदानी समूहाला दिलेल्या सवलती, एमएमआरडीए च्या प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता, गिरणी कामगारांच्या पुर्नविकासात झालेली फसवणूक, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री विक्रम काळे, सतिश चव्हाण, किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"भोकरदन तालुक्यातील (जि.जालना) वीर छत्रपती सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेने सोयाबीन खरेदी करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आलेले असणे, त्याबाबत सदर संस्थेचे अध्यक्ष, सचिव व संचालक यांनी सदर गैरव्यवहार केल्याचे प्राथमिक चौकशीत निदर्शनास आलेले असणे, शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार त्यांचे ७/१२, पासबुक, खाते उतारे व पीक पेऱ्याची पडताळणी यामध्ये विसंगती असल्याने संबधितांविरुध कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री.सुनिल शिंदे, अंबादास दानवे, ॲड.अनिल परब, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विविध प्रकल्प हाती घेण्यात येत असल्यामुळे प्रकल्पबाधितांच्या संख्यांमध्ये वाढ होणे, परंतु प्रकल्पग्रस्तांसाठीच्या सदनिकांची मागणी आणि प्रत्यक्ष पुरवठा यांत कमालीची तफावत असल्याने

अमुद्रित प्रत

प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बृहन्मुंबई महानगरपालिकेपुढे उभा असणे, सन २०१९ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेला ३५,००० सदनिकांची गरज असणे, सन २०२३ मध्ये यामध्ये वाढ होवून हा आकडा ७४,७५२ सदनिकांपर्यंत गेला असणे, सदर तुलनेत गत सात वर्षांत बृहन्मुंबई महानगरपालिकेला शासकीय प्राधिकरणाकडून केवळ २,११३ पुनर्वसन सदनिका प्राप्त झाल्या असून बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्वत:चे भूखंड विकसित करून ३,०११ नवीन पुनर्वसन सदनिका बांधल्या असणे, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनात होत असलेल्या विलंबामुळे प्रकल्पाच्या खर्चाच्या किंमतीत वाढ होणे, यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रकल्पबाधितांसाठीच्या सदनिकांची संख्या वाढविण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ जुलै , २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानपरिषद

अप्रसिद्ध प्रत